भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत
जीवन गौरव पुरस्कार निवड समिती गठीत
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. भीजोपु २०२६(१३)/प्र.क्र.२१०(ई.क्र.१६८४७५९)/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०७ ऑगस्ट, २०२६

वाचा :- १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. रासांधो २०१० / शासंप्रो २०११/प्र.क्र.३०६/सां.का.४, दि. ३० जानेवारी, २०१३
२) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. भीजोपु २०२२(१३) /प्र.क्र.३८८/सां.का.४, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२
३) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग क्र. संकीर्ण २०२२(१३)/ प्र.क्र.३८८/सां. का.४, दिनांक ०७ मे, २०२५
४) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांचे पत्र क्र. सां.का.सं/१६५६, दिनांक २० मे, २०२६

प्रस्तावना :-

उपर्निर्दिष्ट क्र. १ येथील शासन निर्णयान्वये भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेस मान्यता देण्यात आली. त्यास अनुसरुन संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये, स्थापन करण्यात आलेल्या विषयांकित समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या, संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेल्या आहेत. आता, भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार समिती नव्याने गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

या शासन निर्णयान्वये भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार निवड समिती खालीलप्रमाणे नव्याने गठीत करण्यात येत आहे :-

शासकीय सदस्य -

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य	-	अध्यक्ष
२. सचिव, सांस्कृतिक कार्य	-	सदस्य
३. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय	-	सदस्य सचिव

अशासकीय सदस्य -

१. श्री.सुधीर नायक	-	अशासकीय सदस्य
२. पंडित जयतीर्थ मेवुंडी	-	अशासकीय सदस्य
३. श्रीमती आरती अंकलीकर-टीकेकर	-	अशासकीय सदस्य
४. श्रीमती श्रुती सडोलीकर	-	अशासकीय सदस्य
५. श्री. अमरेन्द्र धनेश्वर	-	अशासकीय सदस्य

सदर समिती या शासन निर्णयाच्या दिनांकापासून पुढील तीन वर्षे कालावधीसाठी किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत कार्यरत असेल.

०२. **<u>प्रवास व बैठक भत्ता</u> :-**

समितीच्या अशासकीय सदस्यांना वित्त विभागाच्या प्रचलित शासन निर्णयानुसार प्रवास भत्ता व बैठक भत्ता अनुज्ञेय राहील.

०३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी व लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. सदर खर्च मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती, (०१) शासकीय प्रेक्षागृहे व सभागृहे, (०१) (०३) भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना (२२०५ ३३२१) ५० इतर खर्च या लेखाशिर्षातून त्या-त्या वर्षी उपलब्ध असलेल्या मंजुर तरतूदीतून भागविण्यात यावा.

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०८०७१६३२१२७६४३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DILIP SOPAN SOLASE

Digitally signed by DILIP SOPAN SOLASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS,
2.5.4.20=D88CF2A56EDC338F09BD490729979CB0522F3B3817594F767716F4DFF3A1B161, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=AF039EE19AAD174683FF6B9738A6D180446F4C40E7376611B216C04C9C67E5AF, cn=DILIP SOPAN SOLASE
Date: 2026.08.07 16:32:53 +05'30'

(दिलीप सोपान सोळसे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री, नगर विकास, गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकामे (सार्वजनिक उपक्रम वगळता) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन, क्रीडा व युवा कल्याण आणि अल्पसंख्यांक व औकाफ यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
६. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
७. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
८. सर्व अशासकीय सदस्य (संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत)
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११. महालेखापाल (लेखा परीक्षा) -१ महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा परीक्षा) - २ महाराष्ट्र, नागपूर
१३. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) -१ महाराष्ट्र, मुंबई
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२ महाराष्ट्र, नागपूर
१५. कार्यासन अधिकारी, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१६. निवड नस्ती, सां.का.४